पुढारी



नाशिक : सूक्ष्म प्रकल्प स्पर्धेतील प्रकल्पाची पाहणी करताना मान्यवर.

# विद्यार्थ्यांनी घडविले नावीन्यपूर्ण आविष्कार

**'वाघ अभियांत्रिकी'मध्ये सूक्ष्म प्रकल्प स्पर्धा उत्साहात**

**नाशिक : पुढारी वृत्तसेवा**

के. के. वाघ शिक्षण संस्था संचालित के. के. वाघ अभियांत्रिकी शिक्षण व संशोधन संस्थेच्या वतीने विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्याच्या जडणघडणीसाठी विविध उपक्रम राबविले जातात. त्या अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२१-२२ च्या प्रथम वर्ष विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलता, तर्कबुद्धी आणि नवीन तंत्रज्ञान यांचा समन्वय साधून, विज्ञान व गणित विभागाने 'सूक्ष्म प्रकल्प स्पर्धा' आयोजित केली होती. यात विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या नावीन्यपूर्ण आविष्कारांचे दर्शन घडले.

प्राचार्य डॉ. के. एन. नांदूरकर यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन व पारितोषिक वितरण पार पडले. संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ व सल्लागार समितीच्या सदस्यांनी स्पर्धेच्या ठिकाणी प्रत्यक्ष भेट देऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधत त्यांच्या कौशल्याचे कौतुक केले.

परीक्षक म्हणून प्रा. एन. एम. शहाणे, प्रा. मरियम मणियार व प्रा. सचिन शिंदे यांनी काम पाहिले. स्पर्धेसाठी उपप्राचार्य डॉ. एस. एस. साने, विभागप्रमुख डॉ. प्रीती भामरे, डॉ. डी. एम. चांदवडकर, अधिष्ठाता डॉ. सुनील कुटे यांचे मार्गदर्शन लाभले. प्रा. स्वाती पवार यांनी सूत्रसंचालन केले.

My Nashik Edition
Aug 1, 2022 Page No. 4
newspaper.pudhari.co.in

# के. के. वाघ कॅम्पस ड्राइव्हद्वारे १४ जणांना 'इन्फोसिस'मध्ये संधी

**प्रतिनिधी** | नाशिक

के. के. वाघ महाविद्यालयात बी. एस्सी व बी. बी. ए. विभागातील विद्यार्थ्यांसाठी कॅम्पस ड्राइव्हचे आयोजन करण्यात आले होते. यात १४ विद्यार्थ्यांना इन्फोसिस या नामांकित कंपनीत सिस्टिम असोसिएट म्हणून प्लेसमेंटची संधी मिळाली. वार्षिक २.५ लाखांचे पॅकेज मिळाले. सुमारे ४५ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. त्यापैकी निकिता भुजबळ, प्रिया सोनावणे, देवेश पाटील, भूषण वाघ, निधी शर्मा, श्रेणिक सोनजे, रोहन भामरे, मानसी मैंद, तेजस वट्टमवार, आचल दीक्षित, ओम बिमानी, सौम्या शिखर, निखिल पाटील व संजना महाजन यांची अंतिम निवड झाली.

Divya marathi 02/08/2022

# थोडक्यात

## वाघ अभियांत्रिकीत सूक्ष्म प्रकल्प स्पर्धा

**नाशिक** : के. के. वाघ अभियांत्रिकी शिक्षण व संशोधन संस्थेतर्फे सूक्ष्म प्रकल्प स्पर्धा नुकतीच झाली. यात विद्यार्थ्यांनी संगणक, माहिती तंत्रज्ञान, यांत्रिकी, विद्युत व विद्युतीय क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्ता, यंत्रमानव यांच्या प्रगतीच्या कल्पनांवर आधारित प्रकल्प सादर केले. संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ व सल्लागार समितीचे सदस्य यांनी प्रकल्प पाहणी केली. प्राचार्य डॉ. के. एन. नांदुरकर यांच्या मार्गदर्शनाखाली उपक्रम झाला.

Maharastra times 03-08-2022

# 'ब्रह्मास्त्र' कारची डिझाइन अव्वल

## वाघ अभियांत्रिकीच्या २३ विद्यार्थ्यांची टाकाऊ वस्तूंपासून कार निर्मिती

**प्रतिनिधी** | नाशिक



तामिळनाडू येथील मदुराई शहरात राष्ट्रीयस्तरावरील 'आय एस एन इ इ' या सिझन - ८ क्वाड टॉर्क स्पर्धा नुकतीच पार पडली. स्पर्धेत के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या मेकॅनिकल, प्रॉडक्शन, रोबोटिक्स अॅण्ड ऑटोमेशन आणि इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंगच्या विद्यार्थ्यांनी सुट्या भागांपासून मेक इन इंडियाच्या धर्तीवर स्वदेशी चारचाकी गाडी तयार केली. त्याचे ब्रह्मास्त्र क्वाड असे नामकरण करण्यात आले.

एन्डुरन्स व सस्पेन्शन यात संघाने द्वितीय क्रमांक पटकावला. ब्रह्मास्त्र क्वाड गाडी तयार करताना त्याचे सुटे भाग जसे की, गिअर बॉक्स, सस्पेन्शन, चेसी, ब्रेक्स, एस्थेटिक, स्टिअरिंग आदी साहित्य वापरण्यात आले.



# वाघ अभियांत्रिकीच्या संघाला प्रथम पारितोषिक

**नाशिक** : तमिळनाडू येथील मदुराई शहरात राष्ट्रीय स्तरावरील 'आय. एस. एन. ई. ई.' या सिझन-८ क्वाड टॉर्क स्पर्धेत के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या ब्रह्मास्त्र क्वाड संघाने प्रथम क्रमांक पटकावला आहे. मेकॅनिकल, प्रोडक्शन, रोबोटिक्स अँण्ड ऑटोमेशन आणि इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग विभागाच्या विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग नोंदवत उपकरणांच्या सुट्या भागांपासून तयार केलेल्या गाडीला ब्रह्मास्त्र क्वाड नामकरण करून के. के. वाघच्या संघाने प्रवेशिका सादर केली होती.

मदुराई येथे झालेल्या या स्पर्धेत विविध मापदंडांमध्ये ४५ पेक्षा अधिक संघांना मागे टाकत के. के. वाघच्या ब्रह्मास्त्र संघाने हे यश संपादन केले. यात प्रामुख्याने गाडीची डिझाईन व मुव्हेबिलिटी यात प्रथम क्रमांक तसेच एन्डुरन्स व सस्पेन्शन यात द्वितीय क्रमांक पटकावला. त्याचप्रमाणे ब्रह्मास्त्र संघाला उत्कृष्ट संघनायक म्हणून सन्मानित करण्यात आले. ब्रह्मास्त्र क्वाड गाडी तयार करताना त्याचे सुट्टे भाग जसे की, गिअर बॉक्स, सस्पेन्शन, चेस्सी, ब्रेक्स, एस्थेटिक, स्टिअरिंग मेकॅनिझमसाठी आवश्यक असलेल्या यंत्रसामग्रीचा उपयोग महाविद्यालयाच्या वर्कशॉपमध्ये विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष सहभाग घेत स्पर्धेत सहभाग घेतला. या संघात साईराज रापर्तीवार (टीम लिडर), रोशन उगले व अनिकेत भुसारे (गाडी चालक), अथर्व उगले, मयूर पवार, अजिंक्य मालपुरे, मानस ठाकूर, सत्यम सांबरे, सिद्धेश जाधव, यश जिरे, रुमाल शेख, ओंकार गुळे आदी विद्यार्थ्यांचा समावेश होता.

# साहित्य परिषदेतर्फे शकुंतलाताई वाघ यांचा सत्कार

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**नाशिक :** महाराष्ट्र साहित्य परिषद नाशिकरोड शाखेच्यावतीने स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त क्रांतिदिनी जिल्ह्यातील ज्येष्ठ साहित्यिकांचा सत्कार करण्यात आला. माझ्या हिरदीची उकळी या पुस्तकाच्या लेखिका, साहित्यिका शकुंतलाताई वाघ यांचा विचारवंत रावसाहेब कसबे यांच्या हस्ते स्मृतिचिन्ह व महावस्त्र देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी ज्येष्ठ साहित्यिकांच्यावतीने शकुंतलाताई यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी त्यांनी जात्यावरील ओव्यांचा उल्लेख करून तरुण पिढीने संस्काराची शिदोरी जोपासण्याचे आव्हान केले. स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव पूर्ण करीत असताना अनेक सामाजिक, राजकीय आणि सहकारातील प्रसंगाच्या साक्षीदार



असल्याचे त्यांनी नमूद केले. अध्यक्षीय भाषणात कसबे यांनी स्वातंत्र्याच्या अनेक आठवणींना उजाळा दिला. आपला इतिहास गौरवशाली असून स्वातंत्र्याच्या संघर्षापासून तरुणांनी प्रेरणा घेण्याचा आशावाद व्यक्त केला. साहित्यिकांनी स्वातंत्र्य मिळाल्यानंतर समाज उभारणीत मोलाची भूमिका बजावल्याचे त्यांनी नमूद केले. मसापचे कोषाध्यक्ष सुदाम सातभाई, डॉ. मो. स. गोसावी आदी साहित्यिक उपस्थित होते. सूत्रसंचालन कवी रवींद्र मालुंजकर व प्रशांत केंदळे यांनी केले. कामिनी तनपुरे यांनी प्रास्ताविक केले. सुजाता हिंगे यांनी आभार मानले.

लोकसत्ता Fri, 12 August 2022
https://epaper.loksatta.com/c/6

# के. के. वाघ अभियांत्रिकीतर्फे सूक्ष्म प्रकल्प स्पर्धेचे आयोजन

**नाशिक : प्रतिनिधी**

के. के. वाघ शिक्षण संस्था संचालित अभियांत्रिकी शिक्षण व संशोधन संस्था नाशिकच्या वतीने कै. बाळासाहेब वाघ यांच्या पावलावर पाऊल ठेवून संस्था विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्याच्या जडणघडणीसाठी विविध उपक्रम राबवून प्रगतीची नवनवीन शिखरे पादाक्रांत करीत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून शैक्षणिक वर्ष २०२१-२२ च्या प्रथम वर्ष विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलता, तर्कबुद्धी आणि नवीन तंत्रज्ञान यांचा समन्वय साधून विज्ञान व गणित विभागाच्या वतीने नुकतीच सूक्ष्म प्रकल्प स्पर्धा आयोजित करण्यात आली. या स्पर्धेचे उद्घाटन व पारितोषिक वितरण समारंभ प्राचार्य डॉ. के. एन. नांदूरकर यांच्या हस्ते पार पडला. या उपक्रमात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत संगणक, माहिती तंत्रज्ञान, यांत्रिकी, विद्युत व विद्युतीय क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्ता, यंत्रमानव यांच्या प्रगतीच्या कल्पनांवर आधारित सूक्ष्म प्रकल्प सादर केले. संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ व सल्लागार समितीचे सदस्य यांनी स्पर्धेच्या ठिकाणी प्रत्यक्ष भेट देऊन विद्यार्थ्यांशी सुसंवाद साधून त्यांच्या कौशल्याचे कौतुक केले. परीक्षक म्हणून प्रा. एन. एम. शहाणे, प्रा. मरियम मणियार व प्रा. सचिन शिंदे यांनी कामकाज पाहिले. उपक्रमासाठी उपप्राचार्य डॉ. एस. एस. साने, विभागप्रमुख डॉ. प्रीती भामरे, डॉ. डी. एम. चांदवडकर, अधिष्ठाता डॉ. सुनील कुटे यांचे मार्गदर्शन लाभले. सूत्रसंचालन प्रा. स्वाती पवार यांनी केले.

**QUICK न्यूज**

# वाघ अभियांत्रिकीतर्फे सूक्ष्म प्रकल्प स्पर्धेचे आयोजन